Estd 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

विद्यापीठामध्ये ३२ वा आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सव 'शिवोत्सव—२०१७ दि. १०/०२/२०१७ ते दि. १४/२/२०१७ या कालावधीत आयोजित करणेत आलेला होता. परंतु दि. ११/०२/२०१७ रोजी दुसरा शनिवार व दि. १२/२/२०१७ रोजी रविवार असल्याने या दोन्ही दिवशी प्रशासकीय कार्यालयास असणारी सुट्टी रद्द करण्यात आली होती तसेच दि. ११/२/२०१७ रोजी दुसरा शनिवार अधिविभागांचे नियमित कामकाज सुरु असल्याने फक्त दि. १२/२/२०१७ रोजी रविवारची अधिविभागांची सुट्टी रद्द करण्यात आली असल्याचे जा.क्र. आस्थापना/४१६ दि.०८/०२/२०१७ रोजीच्या परिपत्रकानुसार रद्द करुन नियमित वेळेत प्रशासकीय विभाग व अधिविभाग सुरु ठेवण्यात आले होते.

आता विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठातील **सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना** दिनांक १२/०२/२०१७ रोजीची **पर्यायी सुट्टी सोमवार दिनांक २३/१०/२०१७** रोजी जाहीर करण्यात आलेली आहे.

विद्यापीठातील **प्रशासकीय कार्यालयास (शिक्षकेतर सेवक)** दि. ११/०२/२०१७ रोजीची **पर्यायी सुट्टी मंगळवार दिनांक २६/१२/२०१७** रोजी जाहीर करण्यात आलेली असून सदर दिवशी अधिविभागाचे कामकाज नियमित वेळेत सुरु राहील.

उपरोक्तप्रमाणे सुट्टी केवळ विद्यापीठातील विभाग व अधिविभागाकरिता असून ती महाविद्यालयांना लागू राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच दि. २३/१०/२०१७ व दि. २६/१२/२०१७ रोजी विद्यापीठाच्या पूर्वनियोजित वेळापत्रकाप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या परीक्षा त्या दिवशीच घेण्यात येतील, यांचीही नोंद घ्यावी. तसेच सदर दिवशी हजर असलेल्या सेवकांना संबधित विभागप्रमुखांच्या मान्यतेने पर्यायी सुट्टी देण्यात यावी.

**कुलसचिव**

जा.क्र.आस्थापना/ 2782
दिनांक : 12 OCT 2017

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. प्राचार्य/संचालक, संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था यांना फक्त माहितीसाठी
३. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव, व समकक्ष अधिकारी
४. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
५. स्वीय सहाय्यक मा.कुलगुरु, मा. प्रभारी कुलगुरु, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
६. इंटरनेट विभाग— सदरचे परिपत्रक INTRA NET वर प्रसिध्द करावे

**सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक/प्रशासकीय सेवकांच्या निदर्शनास आणावे.**